# एसटी महामंडळांतर्गत पाच प्रादेशिक विभागांची निर्मिती

## प्रादेशिक विभागांचा लवकरच स्वतंत्रपणे कारभार

**मुंबई–** सुनियोजन व निर्णयाचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने कर्नाटक परिवहन महामंडळाच्या धर्तीवर एसटी महामंडळांतर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. याबाबतचे परिपत्रक नुकतेच एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी काढले आहे. त्यानुसार पुढील काही दिवसांत हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालय सुरू करणार आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजे एसटी महामंडळाच्या नियोजन व पणन खाते अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध संनियंत्रण समित्यांचे कार्यालय ६ डिसेंबर २०१६ पासून बंद करण्यात आले होते. परंतु परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक हे कर्नाटक राज्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तेथील महामंडळाच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना उचलून धरली. त्यामुळे आकार व प्रशासकीयदृष्ट्या कर्नाटक महामंडळाच्या दुप्पट असणाऱ्या महाराष्ट्र एसटी महामंडळाचे देखील किमान ५ प्रादेशिक विभागात विभाजन करावे अशी संकल्पना मांडली.

राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या धर्तीवर एसटीची यंत्रणा उभी आहे. तालुकास्तरावर आगार, जिल्हास्तरावर विभागीय कार्यालय आणि राज्य स्तरावर मध्यवर्ती कार्यालय अशी त्रिस्तरीय रचना सध्या कार्यरत आहे. परंतु राज्य शासनाच्या महसूल विभागाप्रमाणे सहा प्रशासकीय विभागांचा या त्रिस्तरीय रचनेत समावेश नव्हता. त्यामुळे मध्यवर्ती कार्यालयातून थेट विभागीय कार्यालयाशी संवाद साधणे भौगोलिकदृष्ट्या शक्य होत नव्हते. अर्थात, स्थानिक पातळीवर वाहतुकीचे नियोजन करणे, यात्रा- जत्रा यासाठी जादा वाहतूक करणे असे निर्णय घेण्यासाठी विलंब होत असे, अथवा प्रशासकीय दिरंगाईमुळे त्याचा विपरीत परिणाम एसटीच्या महसुलावर होत होता, असे सरनाईक म्हणाले.

**प्रत्येक समितीसाठी अधिकाऱ्यांची नेमणूक**

मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे व अमरावती असे ५ प्रादेशिक विभाग करण्यात आले असून, प्रत्येक प्रादेशिक विभाग अंतर्गत कार्यरत विभाग व मुख्यालय निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्येक समितीसाठी आवश्यक तेवढ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, त्या-त्या भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेत सेवा मिळण्यासाठी सर्व प्रकारचे नियोजन केले जाणार आहे.

# पावसाचे नगर जिल्ह्यात सात बळी

## ११ जखमी; ५३ जनावरे दगावली, २६१ घरांसह जनावरांचे गोठ्यांची पडझड

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** यंदा उन्हाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजेच मे महिन्यांत नगर जिल्ह्यात झालेल्या वादळी पावसात आतापर्यंत ७ जणांचे बळी गेले असून ११ नागरिक जखमी झाले आहेत. यासह २६ मोठी तर २७ लहान जनावरे मृत्यूमुखी पडले असून २४१ घरांसोबत २० जनावरांचे गोठे पडले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या अहवालावरून ही माहिती समोर आली आहे.

यंदा मान्सून पूर्व पावसाने जिल्ह्याच्या दक्षिण भागाला सुरूवापासून झोडपून काढले. यात अहिल्यानगर, पाथर्डी, शेवगाव, कर्जत, नेवासे आणि जामखेड या तालुक्यासह राहुरीचा काही भाग, अकोले तालुक्याच्या काही भागाचा समावेश आहे. या पावसामुळे घरांसह शेतात उभे असणारे चारा पिके, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. विज पडून अथवा अंगावर भिंत झाड पडून जिल्ह्यात आतापर्यंत ७ जणांचा बळी गेला आहे. यात नगर २, अकोले १, नेवासा १, राहुरी १ आणि कर्जतमधील दोघांचा सामावेश आहे. यासह नगर १, कर्जत १, राहुरी २ आणि श्रीगोंदा तालुक्यातील ७ असे ११ व्यक्ती जखमी झालेले आहेत. यासह वादळी पावसामुळे जिल्ह्यात २६ मोठी आणि लहान २७ जनावरे पावसात मृत्यूमुखी पडली आहेत. यात नगर २० लहान जनावरे, अकोले ३ मोठे आणि १ लहान, जामखेड ४ मोठे, कोपरगाव ३ लहान, नेवासा १ लहान, पाथर्डी २ मोठी व ४ लहान, पारनेर १ लहान, संगमनेर ४, शेवगाव १ मोठे, श्रीगोंदा ६ मोठे यांचा समावेश आहे. जिल्ह्यात सर्वाधिक घरांची पडझड संगमनेर ४४, नेवाशात ४१, कर्जत २९, राहुरी २०, पाथर्डी १९, श्रीगोंदा, अकोले आणि पारनेर प्रत्येकी १६, जामखेड १३, कोपरगाव आणि श्रीरामपूर प्रत्येकी ६, राहाता आणि नगर प्रत्येकी ३ यांचा समावेश आहे.

**शेती पिकांचे पंचनामे सुरू**

जिल्ह्यात मे महिन्यांत भाग बदलत जोरदार पाऊस झाला असून यामुळे उन्हाळी हंगामातील कांदा, चारा पिके व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अनेक ठिकाणी उघडीप देत पुन्हा पुन्हा जोरदार पाऊस झालेला असून यामुळे शेती पिकांच्या नुकसानाची माहिती संकलन सुरू असल्याचे सांगण्यात आले.

# विठ्ठलाच्या टोकन दर्शनाला सुरुवात

**पंढरपूर–** महाराष्ट्रासह जगभरातील विठ्ठल भक्तांसाठी ही एक आनंदाची बातमी आहे. आता पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात टोकनद्वारे दर्शनाची नवी व्यवस्था लागू करण्यात येत आहे. तिरुपतीच्या धर्तीवर ही टोकन पद्धत राबवण्यात येत असून, भाविकांना तासंतास रांगेत उभं राहावं लागणार नाही.

**टोकनद्वारे दर्शन कसं मिळणार?**

भाविकांनी www.vitthalrukminimandir.org या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन दर्शनाची तारीख आणि वेळ निवडून टोकन बुक करावं. बुक केलेल्या टोकनची प्रिंट काढून, मंदिराशेजारी असलेल्या संत ज्ञानेश्वर मंडपात त्याची पडताळणी करावी.पडताळणीनंतर दर्शन हॉलमध्ये प्रवेश मिळेल आणि ठरलेल्या वेळेनुसार थेट दर्शन रांगेत प्रवेश दिला जाईल. पांडुरंग हे महाराष्ट्राचं आराध्य दैवत आहे. लाखो वारकरी प्रत्येक वर्षी पंढरपूरमध्ये येऊन विठुरायाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. मात्र यामध्ये अनेक भाविकांना थकवणाऱ्या रांगा, धक्काबुक्की याला सामोरं जावं लागतं. आता टोकन प्रणालीमुळे या अडचणींवर काही अंशी उपाय मिळणार आहे. ही नवी प्रणाली १५ जूनपासून चाचणी स्वरूपात राबवण्यास सुरूवात झाली आहे. सगळं सुरळीत पार पडलं, तर याचा लाभ भविष्यात लाखो भाविकांना होणार आहे. तिरुपती बालाजी मंदिरात जशी टोकन प्रणाली आहे, तशीच प्रणाली आता पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात राबवण्यात येणार आहे. टोकन घेतल्यानंतर भाविकांना दर्शन मंडपाच्या दुसऱ्या मजल्यावर बसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मंडपात बसण्यासाठी पुरेशी बैठकव्यवस्था असून, शौचालय, स्नानगृह, चहा-नाश्ता आणि विठ्ठलाचे ऑनलाईन थेट दर्शन पाहण्याचीही सोय करण्यात आली आहे.

**दर्शनासाठी सहा स्लॉट उपलब्ध**

भाविकांसाठी दर्शनाचे पहिले स्लॉट सकाळी ९ ते १० या वेळेत ठेवण्यात आले आहे. या वेळेत २०० भाविकांना टोकनद्वारे दर्शनासाठी सोडले जाणार आहे. एकूण सहा स्लॉट दिवसभरात उपलब्ध असतील. मात्र आषाढी वारीच्या प्रमुख गर्दीच्या तीन दिवसांव्यतिरिक्त इतर दिवशीच भाविकांना या टोकन दर्शनाची सुविधा मिळणार आहे.

# शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्या केबल चोरीप्रकरणी वरिष्ठांनी लक्ष घालावे- तनपुरे

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** राहुरी तालुक्यात शेतकऱ्यांच्या विद्यूत पंपाच्या केबल चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. यापैकी एकाही चोरीचा तपास लावण्यात राहुरी पोलिसांना यश आले नाही. याबाबत वरिष्ठांनी लक्ष घालून शेतकऱ्यांना योग्य तो न्याय द्यावा, अशी मागणी माजी खासदार प्रसादराव तनपुरे यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे केली आहे.

राहुरी तालुक्यात तनपुरेवाडी रस्त्यावरील प्रसादराव तनपुरे यांची स्वतःची व कोंढवड परिसरापर्यंत नदीकाठच्या विहिरीतील शेतकऱ्यांच्या विद्यूत पंपाच्या केबल आतापर्यंत दोनदा चोरीला गेल्या आहेत. एकदा केबल चोरीला गेल्यास शेतकऱ्यांना जवळपास पंधरा ते वीस हजाराचा फटका बसतो. या चोरट्यांनी एका वेळी २० शेतकऱ्यांच्या केबल चोरून नेल्या आहेत, तरीही पोलीस खात्याकडून या कोणत्याही चोरीचा तपास लागलेला नाही. पुन्हा म्हैसगाव परिसरात अनेक शेतकऱ्यांच्या केबल चोरीला गेल्या आहेत.

वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी याबाबत त्वरित यंत्रणा राबवून या केबल चोरांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी माजी खासदार प्रसादराव तनपुरे यांनी केली आहे.

# ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्याची नेवाशात जय्यत तयारी

**नेवासा (तालुका वार्ताहर)–** सालाबाद प्रमाणे श्री संत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्याचे गुरुवार १९जून रोजी दुपारी ३वाजता प्रस्थान होणार आहे. यंदाचा पालखी सोहळा भव्य दिव्य असून श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानने प्रचंड कष्ट घेऊन माऊलीच्या सोहळ्याची तयारी केलेली आहे.




साधारण ४० दिंड्या परिसरातून या पालखी सोहळ्यात सहभाग नोंदवत आहेत. ग्राम प्रदक्षिणा करून माऊली पंढरपूर कडे पांडुरंगाच्या भेटीला रवाना होणार आहेत. मंदिरातून प्रस्थान दिंडीचे प्रस्थान होईल. श्री तुकाराम महाराज मंदिर, लोखंडे गल्ली, डॉक्टर घुले हॉस्पिटल, हेडगेवार चौक, मारुती मंदिर, श्री मोहिनीराज मंदिर, मुथा मेडीकल, औदुंबर चौक, नगरपंचायत चौक, गणपती चौक, मार्गे नेवासा बस स्टँड येथे रिंगण होईल आणि आराध्या लॉन्स या ठिकाणी पालखीचा पहिला मुक्काम राहणार आहे. त्या ठिकाणी नेवासा खुर्द व नेवासा बुद्रुक गावांच्या सहकार्याने पालखीत सहभागी प्रस्थानाला वाटी लावण्यासाठी आलेल्या माऊली भक्तांसाठी महाप्रसादाचे नियोजन देखील केलेले आहे. १९ जून रोजी पालखी मार्गावरील गावकऱ्यांनी सडा रांगोळ्या, आतिशबाजी,स्वागत फ्लेक्स, औक्षण, करून पालखीचे स्वागत करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# चारधाम यात्रेदरम्यान केदारनाथमध्ये कोसळले हेलिकॉप्टर; चिमुकलीसह ७ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली–** देशात अहमदाबाद विमान अपघाताची घटना ताजी असतानाच उत्तराखंडमधील केदारनाथ धामहून गुप्तकाशीला येणारे आर्यन एव्हीएशनचे हेलिकॉप्टर गौरीकुंड परिसरात कोसळले. चारधाम यात्रेदरम्यान हा मोठा अपघात घडला. या दुर्दैवी अपघातात २ वर्षांच्या चिमुकलीसह सात जणांचा मृत्यू झाला आहे. गौरीकुंड येथे गवत कापणाऱ्या एका नेपाळी वंशाच्या महिलेने या अपघाताची माहिती दिली. पुढील आदेश येईपर्यंत हेलिकॉप्टर सेवा बंद करण्यात आली आहे.

रविवारी (१५ जून) पहाटे ५.३० वाजता केदारनाथ मार्गावर श्री केदारनाथ धामहून गुप्तकाशीला जाणारे हे हेलिकॉप्टर गौरीकुंडपासून सुमारे ५ किमी अंतरावर असलेल्या गौरी माई खार्क येथे कोसळले. प्राथमिक माहितीनुसार, खराब वातावरणामुळे आणि धुक्यांमुळे कॅप्टनचे हेलिकॉप्टरवरील नियंत्रण सूटले आणि हा अपघात झाला.

**महाराष्ट्रातील चिमुकलीचाही मृत्यू**

या दुर्घटनेत कॅप्टन राजबीर सिंग चौहान (३९ वर्ष), बद्रीनाथ केदारनाथ मंदिर समितीचे प्रतिनिधी आणि रासी येथील रहिवासी विक्रम रावत (४७ वर्ष), उत्तर प्रदेशातील रहिवासी विनोद देवी (६६ वर्ष), तृष्टी सिंग (१९ वर्ष), गुजरातमधील रहिवासी राजकुमार सुरेश जयस्वाल (४१ वर्ष), महाराष्ट्रातील यवतमाळ येथील रहिवासी श्रद्धा राजकुमार जयस्वाल आणि काशी (२ वर्ष) अशा सात जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एसडीआरएफ कमांडर अर्पण यादव यांच्या मार्गदर्शनाखाली बचाव पथके तात्काळ रवाना करण्यात आली. घटनास्थळ अतिशय दुर्गम आणि घनदाट जंगलात होते, जिथे एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त पथकांनी जलद आणि समन्वित बचाव कार्य हाती घेतले आहे.

**हेलिकॉप्टर शटल सेवा बंद –**

उत्तराखंड नागरी विमान वाहतूक विभागाच्या (यूसीएडीए) मुख्य कार्यकारी अधिकारी सोनिका यांनी सांगितले की, खोऱ्यात सुरू असलेल्या मदतकार्य आणि हवामान परिस्थितीमुळे परिसरातील हेलिकॉप्टर शटल सेवा बंद करण्यात आल्या आहेत.

# वैजापूर : पत्नीचा खून, पोस्टमन पतीस अटक

**वैजापूर (प्रतिनिधी)–** घरगुती कारणावरून झालेल्या भांडणामुळे रागाच्या भरात पत्नीला कोयत्याने गळ्यावर वार करून खून केल्या प्रकरणी पती विरोधात वैजापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिता चांगदेव शेलार (वय ५५, रा. राहेगाव) असे घटनेतील मयत महिलेचे नाव आहे. तर चांगदेव रामराव शेलार (वय ५८, रा. राहेगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

प्रकरणात वैजापूरचे पोलिस हेड कॉन्स्टेबल किरण गोरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १५ जून रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार उपजिल्हा रुग्णालय वैजापूर येथे सकाळी ६ वाजेच्या सुमारास अनिता चांगदेव शेलार यांना नातेवाईकांनी मृत अवस्थेत दाखल केले असल्याबाबतची नोंद करण्यात आली होती. प्रकरणात पोलिस उपनिरीक्षक पाटील, व हेड कॉन्स्टेबल गोरे यांना पोलिस निरीक्षक ताईतवाले यांनी तपास करण्याबाबत निर्देश दिले. दोघांनी उपजिल्हा रुग्णालय वैजापूर येथे धाव घेतली वैद्यकीय अधिकारी यांना भेटून त्यांनी मयत महिलेच्या मृतदेहाची पाहणी केली.

दरम्यान, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर महिलेला धारदार शस्त्राने गळ्यावर वार केल्याने अती रक्तस्त्राव होऊन मयत झाली असल्याची माहिती पोलिसांना दिली. यानंतर पोलिस उपनिरीक्षक पाटील, पोलिस हवालदार रावते, मेटे, व फिर्यादी गोरे यांनी मयत महिलेच्या घरी जाऊन पाहणी केली. दरम्यान घरातील पुढील रूममध्ये पोलिसांना भिंतीवर रक्ताचे डाग दिसले तसेच फरची, गादी, उशीही रक्ताने माखलेली होती. घटनेबाबत पोलिसांनी मयत महिलेच्या सुनेची चौकशी केली असता तिने आपण १४ जून रोजी रात्री मुलांसह मधल्या रूममध्ये झोपलेलो असताना रात्री ११-११.३० वाजेच्या दरम्यान त्यांना ओरडण्याचा आवाज आला, त्यांनी समोरच्या रूममध्ये येऊन बघितले असता त्यांना त्यांच्या सासऱ्याच्या हातात रक्ताने भरलेला कोयता दिसून आला व सासू बाजूला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. व सासरा हात त्यांना बघून पळून गेला. अशी माहिती सांगितली. मात्र यानंतर मयताची सून ही बोलण्याच्या अवस्थेत नव्हती. त्यामुळे पोलिसांना अधिक काही माहिती मिळाली नाही. यानंतर पोलिसांनी गावात चौकशी केली असता त्यांना गोपनीय बातमीदारांमार्फत कळाले की, सदर मयत महिलेचा पती चांगदेव रामराव शेलार ( ५८ वर्षे, व्यवसाय पोस्टमन, रा. राहेगाव, ता.वैजापूर) याने रात्री त्याची पत्नी अनिता चांगदेव शेलार यांच्यासोबत झालेल्या घरगुती वादाच्या कारणावरून रागाच्या भरात लोखंडी कोयता गळ्यावर मारून दुखापत करून तो राहेगाव येथून फरार झाला आहे. प्रकरणात चांगदेव शेलार यांच्या विरोधात भारतीय न्यायसहिता कलम १०३ (१) अन्वये वैजापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील हे करीत आहेत.

**आरोपीस शिऊर येथून केली अटक**

दरम्यान वैजापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली वैजापूर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक पाटील, हेडकॉन्स्टेबल किरण गोरे, योगेश झाल्टे, रावसाहेब रावते, पोलिस शिपाई ज्ञानेश्वर मेटे यांच्या पथकाने घटनेतील फरार आरोपी चांगदेव शेलार याला शिऊर येथून अटक केली असल्याची माहिती पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.

## पान १ वरुन

### इंद्रायणीवरील पूल कोसळला...

ते कुंडमळा या दोन गावांना जोडणारा एक पूल आहे. हा पूल किमान ४० त ५० वर्षे जुना असल्याचे सांगण्यात येते. पूर्वी हा पूल संपूर्णपणे लोखंडी ढाच्याचा होता. गेल्या काही वर्षात पुलाच्या दोन्ही बाजूचा काही भागाचे सिमेंट बांधकाम करण्यात आले आहे. मात्र, पुलाचा मध्यभाग हा लोखंडीच होता. पर्यटनाला आलेल्या काही नागरिकांनी आपल्या दुचाकी या पुलावर घातल्या. तर काही पर्यटक पुलावर उभे होते. क्षमतेपेक्षा अधिक भार झाल्याने अचानक पुलाचा मोठा आवाज झाला आणि हा लोखंडी पूल कोसळला. पूल कोसळल्यानंतर पुलावरील सर्व पर्यटक आणि त्यांच्या दुचाकी नदीच्या प्रवाहात पडले. काही पर्यटक लोखंडी पुलाच्या साच्याखाली अडकले. त्यामुळे त्यांचा जागीच पाण्यात बुडून मृत्यू झाला. तर काही पर्यटक पुराच्या पाण्यासोबत वाहून गेल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. शासकीय यंत्रणेकडून मिळत असलेल्या माहितीनुसार अंदाजे १०० पर्यटक या पुलावर होते. सदर दुर्घटनेमधून एकूण ३८ व्यक्तींचा बचाव करण्यात आला आहे. त्यापैकी १८ व्यक्ती जखमी झाले असून त्यांना रुग्णवाहिकेच्या मदतीने सोमाटणे फाटा, ता. मावळ येथील १) पवना रुग्णालय, २) मायमर हॉस्पिटल, ३) अथर्व हॉस्पिटल आदी रुग्णालयांमध्ये उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे. उपचारादरम्यान ४ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची २ पथक, आपदा मित्र, पुणे आणि पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, लोणावळ्यातील शिवदुर्ग रेस्क्यू पथक व स्थानिक मदत बचाव संस्था इत्यादी घटनास्थळी दाखल झाल्या असून, मदतकार्य सुरू आहे.

**पुलाचा सांगाडा उचलण्याचे आव्हान...**

या दुर्घटनेत लोखंडी पुलाचा संपूर्ण सांगाडा नदीत कोसळला. पुलावर दुचाकी तसेच चालत असणारे अनेक पर्यटक नदीत कोसळले. काही पर्यटक या पुलाच्या सांगड्याखाली अडकल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर प्रशासनाने चार मोठ्या पेन बोलावून सांगाडा काढण्याचा प्रयत्न चालवला. मात्र, नदीचे पाणी, पात्रातील खडक आणि जोरदार पावसामुळे मदतकार्यात अडथळे येत होते.

**बचावकार्य सुरू, महाजनांसह अनेक नेत्यांची घटनास्थळी धाव**

दरम्यान, या दुर्घटनेची माहिती समजताच मदत व पुनर्वसनमंत्री गिरीश महाजन, मावळ तालुक्याचे आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजपाचे नेते रवींद्र भेगडे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, रघुवीर शेलार यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल घेतली व मदत व बचाव कार्य सुरू करण्यात आले. दुर्घटना घडल्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक व परिसरातील नागरिकदेखील दाखल झाले. त्यामुळे परिसरात मोठी गर्दी झाली होती. परिणामी मदत कार्यास काहीसा अडथळा निर्माण होत होता. त्यातच पावसाच्या सरीही सुरू होत्या. त्यानंतर अंधारही पडला. मात्र, बचाव कार्य सुरूच ठेवण्यात आले होते.

### ट्रॅव्हल बस-मालवाहू ट्रक...

चक्रनारायण (वय ६५, सर्व रा. मुंबई), प्रथमेश राजेंद्र कोल्हे, (वय २४, रा. पोहेगाव, ता. कोपरगाव), मोहमद रफीक जलील शेख (वय ४२, रा. नाईकवाडपुरा, संगमनेर) व अन्य तिघे असे दहाजण गंभीर जखमी झाले झाले.

सदर अपघाताची माहिती मिळताच स्थानिक रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरु केले. याचबरोबर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देवीदास ढुमणे, पोलीस उपनिरीक्षक एस. एस. सातपुते, पोना. सचिन उगले, आशिष आरवडे, प्रमोद चव्हाण, राजेंद्र लांघी यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेत अपघाताची माहिती घेतली आणि मदतकार्य सुरु केले. जखमींना तातडीने संगमनेर येथील खाजगी रुग्णालयात उपचारांसाठी हलविले. तर तिघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात हलविले. या अपघातामुळे काहीकाळ रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी तातडीने वाहतूक सुरळीत केली. सदर अपघातात ट्रॅव्हल बस आणि मालट्रकचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी तालुका पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सातपुते हे करीत आहेत.

### चला शाळेत जाऊया..!

दरम्यान, रविवारी सुट्टीच्या दिवशी गुरूजी शाळांवर हजर होते. त्याठिकाणी त्यांनी शाळा पूर्व तयारीचे नियोजन केले. जिल्ह्यात शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी देखील शाळा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शिक्षक व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### प्रारूपपूर्वी प्रभाग रचनेची...

उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. यात जिल्हा परिषद गटांची संख्या, गणांची संख्या, प्रभागाची संख्या किती असावी, याबाबत सविस्तर आदेश दिलेले आहेत. या कामी प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले असून त्यांच्या अध्यक्षतेखाली उपजिल्हाधिकारी अथवा त्या दर्जाचे अधिकारी, प्रभाग रचनेशी संबंधीत तहसीलदार आणि अन्य अधिकारी संगणक ऑपरेट यांची समिती तयार करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत यात प्रभाग रचना तयार करताना सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी गोपनियता पाळावी. प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द होण्यापूर्वी त्याबाबत राजकीय पक्षाचे व्यक्ती अथवा अन्य व्यक्तींना माहिती देण्यात येवू नयेत, तसेच प्रभाग रचनेचे काम पाहणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांवर कोणीही दबाव टाकू नयेत असे स्पष्ट केलेले आहे.

**गावोगावी खलबते सुरू**

जिल्हा परिषद निवडणूका टप्प्यात येणार असल्याचे दिसताच आतापासून ग्रामीण भागात नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी खलबते सुरू झाली आहे. साधारपणे दिवाळीच्या आतबाहेर जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणूका होणार असल्याची शक्यता आहे. यादृष्टीने राजकीय पक्षांकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. आधी प्रभाग रचना, त्यानंतर आरक्षण आणि त्यानंतर निवडणूकांची तारीख जाहीर होणार असल्याने ग्रामीण भागात आतापासून हुरूप वाढले आहे.

### बदलीसाठी गुरुजी बनले ‘लुळे पांगळे’

यात विशेष संवर्ग म्हणजे स्वत: अपंग असणे अथवा दुर्धर आजाराने पीडित असणे, अथवा अपंग मुलांचे पालक यांचा यात समावेश आहे. या सवलतीचा आधार घेण्यासाठी यापूर्वी जिल्ह्यातील अनेक शिक्षक कृत्रिम अथवा बनावट अपंग झाल्याचे समोर आलेले आहे. यामुळे अशा बनावट अपंग प्रमाणपत्रांची दरवर्षी शिक्षण विभागाकडून पडताळणी आवश्यक आहे. शिक्षकांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रानूसार त्यांना बदलीत सवलत मिळते.२०१२ मध्ये अशा प्रकारे बदली टाळण्यासाठी अथवा बदलीचा लाभ घेण्यासाठी ७५ शिक्षकांनी सादर केलेले प्रमाणपत्र हे बनावट असल्याचे तत्कालीन शिक्षणाधिकारी दिनकर टेमकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रुबल अग्रवाल यांच्या तपासणीत समोर आले होते. त्यानंतर हे प्रकरण अनेक वर्षे सुरू होते.

अशीच परिस्थिती २०२५ मध्ये बदली टाळण्यासाठी अथवा व्हावी, यासाठी काही शिक्षकांनी बोगस अपंग प्रमाणपत्र सादर केल्याची चर्चा सुरू आहे. ही चर्चा खरी की खोटी याचा तपास व्हावा, यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने बदलीसाठी सादर केलेल्या शिक्षकांच्या आजारनिहाय प्रमाणपत्र पडताळणीची गरज निर्माण झाली आहे. सुत्रांच्या माहितीनूसार यंदाच्या बदलीच्या प्रक्रियेत सवलत घेण्यासाठी अनेक अपंग अथवा वैद्यकीय प्रमाणपत्रात गोंधळ असल्याची चर्चा आहे. या चर्चेला पूर्णविराम देण्यासाठी शिक्षण विभागाने आता जिल्ह्यातील अपंग शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची पडताळणीची गरज निर्माण झाली आहे.

**बनावट घटस्फोटाची यापूर्वी तक्रार**

जिल्ह्यात दक्षिणेतील एका शिक्षकाच्या पत्नीने बनावट घटस्फोटाची तक्रार काही महिन्यांपूर्वी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केलेली होती. त्यावेळी दै. सार्वमतने ‘माझ्या नवऱ्याची बायको’ या मथळ्याखाली बातमी देखील प्रसिध्द केली होती. यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांच्या बदलीत घटस्फोटीतच्या नावाखाली बदलीचा लाभासाठी अर्ज केलेल्या प्रकरणाची चौकशीची गरज निर्माण झाली आहे.

**अद्याप बदल्यांची प्रतिक्षा**

यंदा १५ जून महिना संपाला असून शाळा सुरू झाल्या आहेत. मात्र, अद्याप शिक्षकांच्या बदल्याची प्रक्रिया झालेली नाही. शिक्षकांनी बदलीसाठी अर्ज दाखल केलेले असून दाखल अर्जानूसार त्यांचे वर्गीकरण करून शिक्षण विभाग राज्य पातळीवरून बदली आदेशाच्या प्रतीक्षेत आहे. शिक्षकांची बदलीची प्रक्रिया होण्या आधी अपंग प्रमाणापत्रासह अन्य वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केलेल्या शिक्षकांची चौकशी करून बदल्यांची प्रक्रिया राबवण्याची मागणी शिक्षकांमधून होत आहे.

### विद्यार्थ्यांना एसटी पास शाळेत मिळणार

यासंदर्भात १६ जूनपासून एसटी प्रशासनातर्फे ‘एसटी पास थेट तुमच्या शाळेत’ ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तत्पूर्वी सर्व शाळा, महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक आणि प्राचार्यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांना पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगण्यात आले आहे.